आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२४ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडी आणि भाजपातर्फे राज्यात विविध ठिकाणी निदर्शनं.

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जळगाव इथल्या कार्यक्रमात ११ लाख लखपती दीदींशी संवाद साधणार

- नेपाळमध्ये अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने देशात परत आणले जाणार
- क्रिकेटपटू शिखर धवनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधून निवृत्ती

  **आणि**

- राज्यात मोसमी पाऊस पुन्हा सक्रीय

<><><><><>

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात सरकारच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडीच्या घटकपक्षांतर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. या मुद्द्यावर पुकारलेला बंद बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिल्यानंतर आज केवळ निदर्शनं करण्याचा निर्णय मविआने घेतला. मुंबईत दादर इथं शिवसेना भवनासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आंदोलन करण्यात आलं. आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी केला. रश्मी ठाकरे, खासदार संजय राऊत आणि अनिल देसाई, आमदार आदित्य ठाकरे आणि कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही आणि महिलांविरुद्ध होत असलेल्या अत्याचाराच्या घटनांकडे सरकारचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष

करत असल्याचं मत महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मांडलं. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी तोंडाला काळी फीत बांधून सरकारचा निषेध केला. लाडकी बहीण योजना नव्हे, तर सुरक्षित बहीण योजना गरजेची आहे, असं त्या म्हणाल्या. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं काळ्या फिती बांधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर भर पावसात आंदोलन केलं. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी सरकारवर टीका केली. याशिवाय, गडचिरोली, धुळे, वाशी, गोंदिया आणि नागपूर इथंही महाविकास आघाडीच्या घटकपक्षांनी बदलापूरच्या घटनेच्या विरोधात निदर्शनं केली.

नागपूरमधे संविधान चौकात काँग्रेसतर्फे काळ्या फिती बांधून आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><>**

महिलांवर होणाऱ्या अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीच्या नेत्यांची दुटप्पी भूमिका उघड करण्यासाठी भाजपानं आज राज्यात विविध ठिकाणी आंदोलन केलं. मुंबई, छत्रपती संभाजीनगर, अमरावती यासारख्या ठिकाणी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बदलापूर प्रकरणातल्या पीडितांना न्याय देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. महिला अत्याचारासारख्या संवेदनशील विषयावर राजकारण न करता सरकारला सहकार्य करण्याची भूमिका विरोधकांनी घ्यावी. या विषयावर राजकारण करत असलेल्या महाविकास आघाडीचा निषेध करतो, अशा घोषणा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी दिल्या. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते यात सहभागी झाले होते.

<><><><>

राज्य सरकार महिलांच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध असून महिला सुरक्षेसाठी विविध उपाययोजना करण्याचं आश्वासन राज्य सरकारच्या वतीनं आज देण्यात आलं. यवतमाळमध्ये सुरू असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यात सरकारच्या वतीनं हे आश्वासन देण्यात आलं. या योजनेमुळं विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. ही योजना केवळ मत वाढवण्यासाठी नसून महिलांची पत आणि मान वाढवण्यासाठी असल्याचं त्यांनी सांगितलं.

लाडकी बहीण योजनेसह बहीणींना सुरक्षा देऊ. इच्छुक असलेल्या शेवटच्या महिलेपर्यंत सर्वांना यासाठी अर्ज करता येईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. आतापर्यंत सव्वा कोटी महिलांहून अधिक लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. पुढच्या महिन्यातही अर्ज जमा केले तरी जुलैपासूनचे पैसे दिले जातील, असं ते म्हणाले. सरकार बहिणींच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जळगाव इथं येणार आहेत. त्यावेळी ११ लाख लखपती दीदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत. वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न कमावणाऱ्या लखपती दीदींबरोबर ते यावेळी संवाद साधतील. राज्यातल्या स्वयंसहाय्यता गटांसाठी अडीच हजार कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. तसंच पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज जारी करतील. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४

राज्यांमधल्या जवळजवळ ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी होणार आहेत.

<><><><><>

शांतता प्रस्थापित करण्यावर भारताचा दृढ विश्वास असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. युक्रेन दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री आज मायदेशी परतले.  युक्रेन शांतिपरिषदेची दुसरी फेरी भारतात घ्यावी, असा प्रस्ताव आपण मोदी यांच्याशी चर्चेदरम्यान मांडला असं झेलेन्स्की यांनी काल कीव्ह मधे पत्रकारपरिषदेत सांगितलं. त्यावेळी शांतिस्थापनेच्या कोणत्याही प्रयत्नाला भारताचा पाठिंबा राहील असं मोदी यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग असेल.

<><><><><>

नेपाळमधल्या अपघातग्रस्तांना भारतात परत आणण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी युवा कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे नेपाळची राजधानी काठमांडू इथं पोहोचल्या आहेत. त्यांनी त्रिभुवन विद्यापीठ रुग्णालयालाही भेट देऊन जखमींची विचारपूस केली. काठमांडूतल्या भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत २७ भारतीय नागरिक मृत्युमुखी पडले. यात महाराष्ट्राच्या जळगाव जिल्ह्यातल्या २४ जणांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या विनंतीनुसार त्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने भारतात आणले जाणार आहेत.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. भारतीय दूतावास अपघातग्रस्तांना आवश्यक ती सर्व मदत करत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

जगातले विकसित देश मंदी आणि महागाईचा सामना करत असताना भारत त्यामानाने सुस्थितीत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी केलं. W.I.R.C अर्थात पश्चिम भारत प्रादेशिक कौन्सिलच्या ३८ व्या परिषदेत, 'विकसित भारत : २०४७' या विषयावर गोयल काल बोलत होते. भारताच्या वाढीचा दर सात टक्के राहील असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं व्यक्त केला आहे, भारत हे जगाचं आशास्थान असल्याचं गोयल म्हणाले.

<><><><><>

भारतीय क्रिकेटपटू शिखर धवननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधून तसंच देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय जाहीर केला. समाजमाध्यमांवर प्रसारित केलेल्या एका चित्रफितीद्वारे धवनने निवृत्तीचा निर्णय जाहीर केला. चाहत्यांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल शिखर धवनने कृतज्ञता व्यक्त केली. त्याने डिसेंबर २०२२ मध्ये बांगलादेश विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताकडून शेवटचा सामना खेळला होता. धवनने २०१० ते २०२२ पर्यंत ३४ कसोटी, १६७ एकदिवसीय सामने आणि ६६ टी-ट्वेंटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलं आहे.

<><><><><>

जालना इथं गजकेसरी स्टील कंपनीत झालेल्या स्फोटात 22 कामगार जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेत

जीवितहानी झाली नसली तरी  काही कामगार जखमी झाल्याची पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर- कोल्हापूर रस्त्यावर अणुस्कुरा घाटात आज पहाटे दरड कोसळली असून, वाहतूक ठप्प झाली आहे. दरड बाजूला हटवण्याचं काम सुरू असून, वाहतूक अद्याप सुरू झालेली नाही.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर १६ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाच्या वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घातली आहे. ५ सप्टेंबरला मध्यरात्री १२ वाजल्यापासून ८ सप्टेंबरला रात्री ११ वाजेपर्यंत, ११ सप्टेंबरला रात्री ८ वाजल्यापासून १३ सप्टेंबरला रात्री ११ वाजेपर्यंत तर १७ सप्टेंबरला सकाळी ८ वाजल्यापासून १८ सप्टेंबरला रात्री ८ वाजेपर्यंत ही बंदी लागू असेल.

**<><><><><>**

राज्यात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून विविध ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली.

राजधानी मुंबईत कालपासून अधून मधून पावसाच्या जोरदार सरी येत असून किनारी भागात सोसाट्याचे वारे वाहत आहेत. ठाणे आणि पालघर जिल्ह्यातही तुरळक ठिकाणी पावसाच्या धारांचा आनंद नागरिक लुटताना दिसत आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात मोठ्या विश्रांतीनंतर कालपासून पुन्हा पावसानं दमदार हजेरी लावली. मध्यरात्रीपासून पावसाचा जोर कायम आहे. जिल्ह्यात आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ९९ टक्क्यांहून अधिक पावसाची नोंद झाली. **अहमदनगर**

जिल्ह्यात कालपासून जोरदार पाऊस सुरू असल्यानं दक्षिणी भागातल्या नद्या प्रवाहित झाल्या आहेत. शहरातून वाहणाऱ्या सीना नदीला पूर आला आहे. **जालना** शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात काल रात्री उशिरापर्यंत पावसानं हजेरी लावली. **नांदेड** जिल्ह्यात तीन तालुक्यांतल्या आठ महसूल मंडळांमध्ये आज सकाळी आठ वाजेपर्यंत अतिवृष्टीची नोंद झाली, तर **बीड** जिल्ह्यातल्या सात तालुक्यांमधल्या ११ महसुली मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली.

भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे की, पूर्व मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार झालं असून राज्यात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो.